| MHKO160004332020 | **नियमित दिवाणी दावा क्र.६४/२०२० मधील नि.क्र.४१ खालील आदेश** |
|---|---|

**०१.** वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६ नियम १७ अन्वये दावा दुरूस्तीसाठी दाखल केला आहे.

**०२.** वादीचे थोडक्यात कथन की, वादींनी प्रस्तुतचा दावा हा वाटप होऊन तुटक कब्जा मिळणेकरीता व कायम मनाईसाठी दाखल केला आहे. वादीने सदर अर्जाद्वारे दावा अर्जी कलम ३ ८अ प्रमाणे अर्जात नमूद केलेप्रमाणे मजकूर समाविष्ट करणेत यावा, तसेच कलम १५ मधील मागणीमध्ये कलम १५क मध्ये अर्जात नमूद केलेप्रमाणे दुरूस्ती करणेत यावी अशी विनंती केली आहे. वादीचे कथनानुसार सदर दावा दाखल केलेनंतर प्रतिवादी दावा मिळकतीचे स्वरूपामध्ये बदल करणेचा प्रयत्न करीत आहेत व त्यामुळे सदरची दुरूस्ती करणे गरजेचे आहे. शेवटी वादीने अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**०३.** प्रतिवादीं क्र. १,२,४,५ यांनी सदर अर्जास नि.४६ वर त्यांचे म्हणणे देऊन वादीचे अर्जातील संपूर्ण मजकूर खोटा असलेचे कथन केले आहे. प्रतिवादींनी कथन केले की वादी कथन करतात तसे अर्जास कोणतेही कारण घडलेले नसून वादीची मागणी बेकायदेशीर व चुकीची आहे. वादीने सदरकामी तूर्तातूर्त मनाई अर्जावर नॉट प्रेस असे लिहून दिले असलेने वादीस तूर्तातूर्त मनाई अर्जाबाबत पुन्हा वाद उपस्थित करता येणार नाही व अशी दाद मागता येणार नाही. शेवटी त्यांनी वादीचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

**०४.** मी वादी, प्रतिवादीं यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला, अभिलेखावरील सर्व कागदपत्रें, वादी आणि प्रतिवादीं यांचे वादपत्र यांचे अवलोकन केले आहे. वादीचे

कथनानुसार प्रतिवादींनी दावा दाखल केलेनंतर दावा मिळकतीचे स्वरूपामध्ये बदल केलेने वादीने दावा अर्जी कलम ८ नंतर ८अ असा मजकूर समाविष्ट करावा व कलम १५क मध्ये अर्जात नमूद केलेप्रमाणे दुरूस्ती करावी अशी विनंती केली आहे. याउलट प्रतिवादींनी वादीची सर्व कथने नाकारली असून अर्जास नमूद केलेप्रमाणे कोणतेही कारण घडले नसून अर्ज नामंजूर करणची विनंती केली आहे. दोन्ही बाजूंची परस्परविरोधी कथने पाहता याबाबत याबाबत विस्तृत पुरावा अभिलेखावर येणे गरजेचे आहे. तथापि वादीने अर्जात नमूद केलेली दुरूस्ती पाहता त्यामुळे दाव्याचे स्वरूपावर कोणताही बदल होत नाही. वादीने सुचविलेल्या दुरूस्त्या दावा मिळकतीमध्ये दावा दाखल झाल्यानंतर झालेल्या बदलाबाबतच्या असल्याचे दिसून येते. त्यामुळे जरी वादीने पुराव्याचे शपथपत्र दाखल केले असले तरी दाव्याचा गुणदोषावर निकाल होणेसाठी दावा मिळकतीमध्ये दावा दाखल झालेनंतर झालेले बदल अभिलेखावर येणे गरजेचे आहे. सदरची वादीची दुरूस्ती ही फॉरमल स्वरूपाची असल्याने त्यामुळे दाव्याच्या स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. दोन्ही पक्षकारांचे सर्व वादमुद्दे निकाली होणेसाठी सदर दुरूस्ती करणे गरजेचे आहे. सबब, सदर दुरूस्ती मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, वर नमूद निष्कर्षास अनुसरून मी खालील आदेश करीत आहे.

## <u>आदेश</u>

**०१.** अर्ज नि.४१ मंजूर करण्यात येत आहे.

**०२.** वादी यांना वादपत्रामध्ये दुरूस्ती करण्यास परवानगी देण्यात येत आहे आणि वादी यांनी अर्जामध्ये नमूद दुरूस्ती पुढील तारखेपर्यंत करावी आणि दुरूस्त दावा प्रत न्यायातयात दाखल करावी.

खुल्या न्यायालयात घोषित.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Pankaj Bhimrao Pawar

**दिनांक- ११/०९/२०२५** **( पी. बी. पवार )**

**दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**

**मलकापूर-शाहूवाडी**